## प्रेस नोट दिनांक २५/०६/२०१९

## स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे

## हरविलेला ड्रोन कॅमेरा केला परत

दिनांक २४/०६/२०१९ रोजी प्रतिक राजेंद्र किरवे वय २० वर्ष रा. मु.पो. कुडाळ ,ता. जावळी जि. सातारा यांनी त्यांचे उपजिवीका चालविणेसाठी साधन म्हणून आज रोजी इसम नामे कशिस व्हिजन मुंबई यांचेकडून ९७,००० रू. चा ड्रोन कॅमेरा विकत घेतला होता. कॅमेरा घरी सातारा येथे घेवून जाणेसाठी ते स्वारगेट एस.टी. स्टॅंड येथे आले व तेथेच ड्रोन कॅमेरा विसरून गेले. पेट्रोलींग ड्युटीसाठी नेमलेले पो.हवा. ३२७ धोत्रे व पो.ना. ४७८३ खोमणे यांना सदर कॅमेरा मिळून आला व त्यांनी पोलीस स्टेशऩ येथे घेवून येवून त्याचे मालकाचा शोध घेवून त्यास संपर्क साधून तात्काळ परत केला आहे. पो.ना. खोमणे व पो.हवा. धोत्रे यांचे सतर्क पेट्रोलींगमुळे चोरीचा गुन्हा टळला आहे.

